खे.ता.शि.प्र.मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

## इतिहास  विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२२-२३

## वार्षिक अहवाल

महाविद्यालयातील इतिहास  विभाग अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये प्रथम वर्ष कला या वर्गात एकूण १०२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. द्वितीय वर्षामध्ये एकूण ३३ विद्यार्थ्यांनी विशेष स्तर  म्हणून इतिहास या विषयाची निवड केली. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी ऑगस्ट क्रांतिदिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात  निबंध  स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. क्रांतिकारक हुतात्मा राजगुरू यांच्या जयंती निमित्ताने महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी  महाविद्यालयांमध्ये अत्यंत उत्साहात २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला या दिनानिमित्त महाविद्यालयामध्ये रांगोळी स्पर्धा,चित्रकला स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा, वाद विवाद स्पर्धा, निबंध स्पर्धा इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले तसेच संविधाना प्रती जनजागृती करण्यासाठी पथनाट्य देखील आयोजित करण्यात आले.

ऐतिहासिक स्थळ भेट या उपक्रमांतर्गत राजगुरुनगर शहरातील दिलावर खान दर्गा,हुतात्मा राजगुरूंचे जन्म स्थळ राजगुरूवाडा,सिद्धेश्वर मंदिर या ठीकांना भेटी देण्यात आल्या.

अशाप्रकारे शैक्षणिक वर्ष २०२२-२३  मध्ये विद्यार्थ्यांच्या विविध कलागुणांना वाव देण्यासाठी विशेष स्तरावर प्रयत्न करण्यात आले.